

समता शिक्षण संस्था, पुणे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे)**

**ता. जि. धुळे**

---

**भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

**यांची जयंती व वाचन प्रेरणा दिवस**

**अहवाल २०१५-१६**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे येथे ग्रंथालयामार्फत भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव यांनी केले होते.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. गोपाळ निंबाळकर यांनी स्विकारले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. सुदाम राठोड उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित अध्यक्ष व प्रमुख पाहुणे आणि सर्व उपस्थित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक मनोगत महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी केले. आपल्या प्रास्ताविक मनोगतात जगदेव यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण, मराठी भाषा सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी एक परिपत्रक काढुन सर्व शालेय शिक्षण संस्था, विद्यापीठ, महाविद्यालये आणि ग्रंथालये यांनी १५ ऑक्टोबर २०१५ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्याचे कळविले होते. त्या अनुषांगाने ग्रंथालयामार्फत प्रा. गजेंद्र जगदेव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्याचबरोबर जगदेव यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची महती सांगितली अब्दुल कलाम हे शेवटच्या क्षणापर्यंत लोकांपर्यंत आणि नवयुवक विद्यार्थ्यीपर्यंत संवाद साधत राहिले. भारताचे पहिले वैज्ञानिक राष्ट्रपती म्हणुन त्यांना ओळखले जाते. वैज्ञानिक क्षेत्रामध्ये डॉ. कलाम यांनी उत्तम प्रगती केलेली आहे. त्यांनी उत्तम कार्याबद्दल भारत सरकारने १९९७ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांची दुरदृष्टी अशी होती की, भारत देशाची आर्थिक प्रगती, सुबत्ता आणि आपला भारत देश महासत्ता होण्यास कारणीभुत आहे. त्या करीता देशातील समाजातील भ्रष्टाचार दोन मार्गांनी निपटुन काढता येणे शक्य आहे. एक आपण सनदशीर मार्गाने संसदेकरीता योग्य उमेदवार निवडुन देणे. दुसरे भ्रष्टाचार मुक्त समाजाची सुरुवात घरातील नैतिक मुल्यांपासुन होते आणि भ्रष्टाचार निर्मुलन करणे ह्या गोष्टी

फक्त तीन व्यक्तींना करणे शक्य आहे. त्या म्हणजे आई वडील, शिक्षक व संसद हे तीन दैवतच काम करु शकतात. समाजाच्या भ्रष्टाचाराची पाळेमुळे ही घरामध्ये रुजलेली असतात. तुम्ही तुमच्या घरातील गैरकृत्याची दखल घेतली आणि त्याबाबत जाब विचारा, योग्य व्यक्तींना खबर दसया ही तुमची जबाबदारी आहे. तुम्ही ती नकारु शकत असे डॉ.कलाम म्हणतात. यांच्या जीवनकार्याची महती ग्रंथपाल जगदेव यांनी सांगितली.

सदरील वाचन प्रेरणा दिवसाबाबत प्रा.डॉ.सुदाम राठोड यांनी आपल्या मार्गदर्शन मनोगतातुन विद्यार्थ्यांना सांगितले की, वाचन संस्कृती ही लोप पावत चालली आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी, नवयुवकांनी दररोज वाचन करणे ही एक काळाची गरज आहे. वाचनाने मनशुध्द होते. वाचनाने ज्ञान प्राप्त होते. डॉ. अब्दुल कलाम हे वाचनप्रेमी होते. ते वैज्ञानिक संशोधनाचे ते प्रणेते त्यांना म्हणता येईल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. गोपाळ निंबाळकर यांनी अध्यक्षीय समारोप करतांना वाचनाचे महत्व, वाचनसंस्कृती टिकवणे, गरजेचे आहे. दररोज आपण सर्वांनी वाचन केलेच पाहिजे. वाचनाशिवाय जीवन जगणे अशक्य आहे. त्यावर म्हणतात की, वाचाल तर वाचाल त्याबरोबरच वाचनाने मनन, चिंतन केल्याने माणसाची विवेकशीलता वाढते. त्याचबरोबर तर्काधिष्टीत विचार करण्याची क्षमता वाढते, दुरदृष्टी वाढते. ज्या विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा आहे. त्याकरीता शिक्षकांनी कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन केले पाहिजे. चांगले संस्कार विद्यार्थ्यांवर आपण करु शकतो. त्यांनी विल्यम आर्थरवाड यांचे उदाहरण सांगितले की, सुमार दर्जाचा शिक्षक केवळ सांगतो, चांगला शिक्षक स्पष्टीकरण देवुन शिकवतो, त्याहुन उत्तम शिक्षक गुणवत्ता दाखवुन देतो आणि महान शिक्षक स्फुर्ती प्रोत्साहन देतो. सर्व विद्यार्थ्यांनी स्वप्ने पहावीत. परंतु ते स्वप्न गुणवत्तेची असावीत अशा प्रकारची उदाहरणे देवुन आपल्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित हाते. त्यामुध्ये प्रा.डॉ.संजीव पगारे, प्रा.एस.डी.वळवी, प्रा.राजेंद्र बैसाणे,प्रा.प्रीती वहाणे, प्रा.राहुल आहेर, प्रा.मेघावी मेश्राम, प्रा.डॉ.सुवर्णा बरडे, श्रीमती. आम्रपाली सूर्यवंशी, श्री.विशाल भदाणे, श्री.सुधीर पाटील, श्री. रविंद्र कदम, श्रीमती.रेखाबाई उफाडे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे उपस्थितांचे आभार विजय आगळे यांनी मानले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. सुभाष बागुल यांनी सहकार्य कले.

डॉ.अब्दुल कलाम यांनी जयंती व वाचन प्रेरणा दिवस या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. अशाप्रकारे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

**ग्रंथपाल** | **प्राचार्य**

**प्रा.गजेंद्र जगदेव** | **प्रा.डॉ.जालिंदर अडसुळे**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे



---

## भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम २०१६-१७

## अहवाल

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे ग्रंथालयातर्फे आयोजित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १५ ऑक्टोबर २०१६ रोजी डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या दृष्टीकोनातुन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचनाची महत्व वाढावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने सामान्यज्ञान परिक्षा डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारीत घेण्यात आली त्यानंतर डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचा कार्यक्रम दु. १२:०० वाजता घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर अध्यक्ष स्थानी होते. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने प्रा. प्रीती वहाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात सुरुवातील भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच प्रतिमांचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने कळविले आहे. सदरील परिपत्रकान्वये आपल्या महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा निर्माण करण्यात आला आहे. त्याचबरोबर सामान्यज्ञान परिक्षा, विद्यार्थ्यांचे मनोगत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मनोगत, उत्कृष्ट मनोगत व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर "असे घडवा तुमचे भविष्य" हा ग्रंथ डॉ. अब्दुल कलाम लिखित भेट देण्यात येणार आहेअसे सांगितले. तदनंतर ग्रंथपाल यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरती प्रकाश टाकला डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी

तामिळनाडु मध्ये रामेश्वरम् येथे झाला. डॉ.अब्दुल कलाम यांना भारत सरकारने पद्मभुषण पुरस्कार, पद्मविभुषण पुरस्कार, भारतरत्न आणि मिसाईलमॅन म्हणुन गौरविण्यात आले आहे.

जर आपल्याला वाचन संस्कृती टिकवायची असेल तर ज्ञान मिळविण्यासाठी वाचन केले पाहिजे. शिक्षणाचा पाया मजबुत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगल्या भाषेच्या आकलनासाठी उच्चार, व्याकरण, संदर्भ, अर्थ यांच्या विकासासाठी वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे. पुस्तकाने मस्तक सुधारते, सुधारलेले मस्तक कुणाही पुढे झुकत नाही. प्रत्येकाने त्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे.

सर्व विद्यार्थ्यांना डॉ. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या 'अग्निपंख', 'बियॉण्ड २०२०', 'असे घडवा तुमचे भविष्य' या पुस्तकांची ओळख करुन दिली.

महाविद्यालयातील प्राध्यापिका प्रीती वहाणे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. अब्दुल कलामांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अब्दुल कलाम यांना बालपणापासुनच वाचनाची आवड होती. बालवयात ते नेहमी 'दिनमणी' या वृत्तपत्राचे वाचन करीत असे. लोकांशी डॉ. अब्दुल कलाम थेट संवाद साधण्याच्या शैलीमुळे पिपल प्रेसिडन्स् म्हणुन ओळखले जाऊ  लागले. तसेच डॉ. अब्दुल कलाम डी.आर.डी.ओ. आणि इस्त्रो या संस्थेत कार्यरत असतांना मिसाईल (अग्नी व पृथ्वी ) तयार केले म्हणुन त्यांना मिसाईल मॅन म्हणुनही ओळखले जाते. त्यांच्या अशा उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पदाकरीता नाव पुढे आले आणि नऊ लाखापेक्षा अधिक मते मिळवुन डॉ. अब्दुल कलाम यांनी २५ जुलै २००२ रोजी आपल्या भारताच्या राष्ट्रपती पदाची धुरा सांभाळली.

आपल्या राष्ट्रपती  पदाच्या कारकिर्दीत भारताच्या हिताच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न केले. राष्ट्रपती पदाच्या काळात त्यांनी डॉ. मनमोहन सिंग यांना पंतप्रधान पदाची शपथ दिली. डॉ. अब्दुल कलाम हे लोकांच्या व नवयुवकांचे आदर्श प्रेरणास्थान बनले. युवा म्हणुन तुम्ही अशी शपथ घ्यायला हवी की, देशाचा युवा नागरिक या नात्याने हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात सचोटीने काम करुन यश मिळवले पाहिजे. आपल्या समाजामधला भ्रष्टाचार दोन मार्गांनी निपटुन काढता येणे शक्य आहे. सनदशीर मार्गाने संसदेकरीता योग्य उमेदवार निवडुन देणे, दुसरे भ्रष्टाचार मुक्त समाजाची सुरुवात घरातील नैतिक मुल्यांपासुन करणे. भ्रष्टाचाराचे निर्मुलन करणे भक्त तीन व्यक्तींवर अवलंबुन आहे, त्या व्यक्ती म्हणजे आई, वडील आणि शिक्षक होय. त्याचबरोबर प्रा. प्रीती वहाणे यांनी प्रत्येक युवकाने चारित्र्यसंपन्न असायला पाहिजे असे आपल्या मनोगतातुन सांगितले.

त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी खंडेकर पुंडलिक, भामरे कल्पेश, कोळी आकांक्षा, मनोज वाघ आणि अमीर झारी यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर अधारीत आपले मनोगत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमात अमीर झारी या विद्यार्थ्याने डॉ. अब्दुल कलाम यांचा जीवनपट पावर पॉईंट प्रेझेंटटेशनच्या माध्यमातुन सांगितला. उत्कृष्ट असे मनोगत अमीर झारीने केले.

त्यानंतर कार्यक्रमात सामान्यज्ञान व उत्कृष्ट मनोगत व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे यांच्या हस्ते 'असे घडवा तुमचे भविष्य' हे पुस्तक प्रोत्साहनपर भेट देण्यात आले. तसेच डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारीत घेण्यात आलेली सामान्यज्ञान परिक्षेत यशस्वी झालेल्या प्रथम क्रमांक खंडेकर पुंडलिक जयदेव, व्दितीव क्रमांक बोरसे बाबुलाल व तृतीय जाधव प्रिंकल राजु यांना बक्षीस म्हणुन 'असे घडवा तुमचे भविष्य' महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे , प्रा. प्रीती वहाणे, प्रा. डॉ. संजीव पगारे, प्रा.डॉ. आर.एस.महाजन तसेच महाविद्यालयातील ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना विचारांना नवीन दिशा देणारे प्रेरणादायी पुस्तक भेट म्हणुन देण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, आपले हृदय, चारित्र्य, राष्ट्र आणि जग यामध्ये एक सुंदर बंध आहे. समाजामध्ये नितिमान, सच्ची वागणुकीचा प्रसार सर्व स्तरांमध्ये झाला पाहिजे. त्याकरीता आपल्या कुटुंबामध्ये नैतिकता असायला हवी. शिक्षणामध्ये खरेपणा, प्रामाणिकपणा, कामकाजामध्ये नितिमत्ता असायला हवी. डॉ. अब्दुल कलाम यांच्या उल्लेखनीय कामगिरीमध्ये त्यांची जात न पाहता त्यांना राष्ट्रपती पदाचा बहुमान मिळाला. राष्ट्रपती पदावर असतांना ते जितके लोकप्रिय होते तितकेच ते आजही लोकप्रिय आहेत म्हणुन त्यांनी भारताचे स्वप्न पाहिले की, भारत २०२० मध्ये महासत्ता बनु शकतो. स्वप्न न समाजता त्याकडे आपण ध्येय म्हणुन पाहणे आवश्यक आहे. धार्मिक आणि जातीत न अडकता समाजासाठी आणि आपल्या देशासाठी सतत कार्यशील असणे आवश्यक आहे. आपल्या मनोगतातुन इंडामेंटबल स्पिरीट इंस्पायरींग थॉट्स, इंडिया २०२० : अ व्हिजन फॉर द न्यु मिलेनिअम आणि इग्नायटेड माइण्ड्स ही त्यांनी लिहिलेली पुस्तके सर्वाधिक लोकप्रिय आहेत. ही पुस्तकं प्रत्येक विद्यार्थ्याने वाचली पाहिजेत, देशातील प्रत्येक नागरिकाला ही पुस्तके मार्गदर्शक ठरणारी आहेत. असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात सांगितले. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. त्याचबरोबर ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम परिक्षेच्या कालावधित देखिल यशस्वीरीत्या पुर्ण केला असे मत त्यांनी व्यक्त केले.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वनश्री बैसाणे या विद्यार्थ्यीनीने केले तर कार्यक्रमाचे सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे आभार अमीर झारी यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथालयातील कर्मचारी श्री. मनोज ठाकरे, श्रीमती, आम्रपाली सुर्यवंशी, श्री. विशाल भदाणे, श्री. सुभाष बागुल, श्री. विजय आगळे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी सर्व उपस्थितांना अल्पोपहार दिला व कार्यक्रमाची सांगता झाली. पुर्ण दिवस डॉ. अब्दुल कलाम वाचन कट्टा महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित करण्यात आला होता उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**




**भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचे प्रतिमा पुजन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर**



**महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सरयांचे स्वागत करतांना श्री मनोज ठाकरे**




**महाविद्यालयाचे प्राध्यापिका प्रीती वहाणे यांचे स्वागत  करतांना ग्रंथपाल गजेंद्र जगदेव**



## वाचन प्रेरणा दिना निमित्त भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर अधारीत मनोगत व्यक्त करणारे विद्यार्थी











**वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना**




**वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना**




**वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना "असे घडवा तुमचे भविष्य" ग्रंथ भेट देतांना प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर**



**वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना "असे घडवा तुमचे भविष्य" ग्रंथ भेट देतांना महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी**







**वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील विद्यार्थ्यी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी**



**वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करणारे महाविद्यालयतील सर्व ग्रंथालयीन कर्मचारी**




***धन्यवाद !***

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे)**

**ता.जि.धुळे**



---

## भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम २०१७-१८

### <u>अहवाल</u>

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे ग्रंथालयातर्फे आयोजित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १३ ऑक्टोबर २०१७ रोजी डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या दृष्टीकोनातुन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचनाची महत्व वाढावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांकरीता वाचन अनुभव मनोगत व्यक्त करण्याची स्पर्धा तसेच काव्य वाचन स्पर्धा या उपक्रमाचे आयोजन दि. १३/१०/२०१७ रोजी वेळ ठिक दु. १:०० वाजता घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर अध्यक्ष स्थानी होते. सदरील कार्यक्रमात सुरुवातील भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने कळविले आहे. सदरील परिपत्रकान्वये आपल्या महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा निर्माण करण्यात आला आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांकरीता वाचन अनुभव मनोगत व्यक्त करण्याची स्पर्धा तसेच काव्य वाचन स्पर्धा या उपक्रमाचे आयोजन केले होते. उत्कृष्ट अनुभव मनोगत व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर ग्रंथ भेट देण्यात येणार आहेअसे सांगितले. तदनंतर ग्रंथपाल यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरती प्रकाश टाकला. डॉ. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या 'अग्निपंख', 'बियॉण्ड

२०२०', 'असे घडवा तुमचे भविष्य' या पुस्तकांची ओळख करुन दिली. डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडु मध्ये रामेश्वरम् येथे झाला. डॉ.अब्दुल कलाम यांना भारत सरकारने पद्मभुषण पुरस्कार, पद्मविभुषण पुरस्कार, भारतरत्न आणि मिसाईलमॅन म्हणुन गौरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी विंदानी लिहीलेल्या बालसाहित्यावर प्रकाश टाकला. बालगीतात मराठी भाषेचा ज्या तऱ्हेने उपयोग केला आहे तसा उपयोग फक्त संस्कृतोपन्न भाषेतच करता येऊ शकेल. बालकविता शब्द, अनुप्रास व यमके, श्लेषालंकार सहजपणे दिसुन येतो. त्यांची बालगीतेही बालकांकरीता व प्रौढांनाही उपयोगी पडतात. विंदा करंदीकरांनी लिहीलेली बालकविता - राणीची बाग, सशाचे कान, टोप, सर्कसवाला, एकदा काय झाले, परी ग परी, एटु लोकांचा देश, बागुल बुवा, साता ऐके सात इ. साहित्याची ओळख करुन दिली.

प्रस्ताविकेनंतर वाचन अनुभव मनोगत आणि काव्यवाचन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. त्यासाठी स्पर्धेचे परिक्षक म्हणुन महाविद्यालयाचे प्रा.डॉ. सुदाम राठोड आणि प्रा.प्रीती वहाणे उपस्थित होते. प्रथमतः वाचन अनुभव मनोगत स्पर्धेत बी.एस.डब्ल्यू. आणि एम.एस.डब्ल्यू. या वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

वाचन अनुभव मनोगत स्पर्धेत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या बद्दल त्याला आलेले अनुभव व्यक्त केले त्यात नवी दिशा देणारे प्रेरणादायी पुस्तक, असे घडवा तुमचे भविष्य, अग्निपंख या पुस्तकांचे अनुभव स्पर्धकांनी मांडले. तर काही विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा या कादंबरीचे वाचन अनुभव स्पष्ट केले तर एका विद्यार्थ्यांने वामनदादा लिखित डॉ. बाबासाहेब साहेबांची गिते या पुस्तकांबद्दल अगदी चांगल्या पध्दतीने आपले मनोगत व्यक्त केले. तसेच काव्य वाचन स्पर्धेतही एम.एस.डब्ल्यू. या वर्गातील सहभाग नोंदविला त्यात सदर विद्यार्थ्यांनी स्वलिखीत कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी सुरुवातील महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाचे अभिनंदन केले तसेच उपस्थित स्पर्धक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यी यांचेही अनिभनंदन केले. पुढे सरांनी वाचनाचे महत्व सांगतांना यशस्वी वाचकांचे उदाहरण दिले त्यात त्यांनी काजोल देवगण, शाहरुख खान, करण जोहर यांच्यामधील समान धागा म्हणजे त्या चित्रपट सृष्टीतील अत्यंत यशस्वी व्यक्ती आहेत. पण त्याहीपेक्षा त्यांच्यातील साधर्म्य म्हणजे या तीनही व्यक्ती प्रचंड वाचन करतात. तसेच बिल गेट्स, मार्क झुकेरबर्ग, वॉरन बफेट ही जागतिक किर्तीची मंडळी सतत वाचनात मग्न असतात. जे वाचनातुन भाषेवर प्रभत्व मिळवतात तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वाचन चांगले असते ते सामाजिक समस्यांबद्दल

अधिक जागरुक असतात. वाचनाने मनुष्य समृध्द होतोच तर अधिक वाचन केल्याने आपले आयुष्यही वाढते तसेच उत्कृष्ट वाचक व्हा आस मौलिक संदेश त्यांनी उपस्थित सर्व स्पर्धक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यी यांना दिला. तसेच परिक्षकांना स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यास सांगितले.

त्यानंतर प्रा.डॉ. सुदाम राठोड सर यांनी वाचन अनुभव मनोगत स्पर्धेचा निकाल जाहिर केला त्यात गौतम तुकाराम वाघ आणि वनश्री अशोक बैसाणे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. व्दितीव क्रमांक झारी अमिर निसार व तृतीय क्रमांक भामरे कल्पेश अमृत यांनी पटकावला. यांना बक्षीस म्हणुन महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे, प्रा. गोपाळ निंबाळक, प्रा. डॉ. संजीव पगारे तसेच महाविद्यालयातील ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते ग्रंथालयामार्फत ग्रंथ भेट देण्यात आले.

त्यांनतर प्रा. प्रीती वहाणे मॅडमांनी काव्य वाचन स्पर्धेचा निकाल जाहिर केला त्यात प्रथम क्रमांक गौतम तुकाराम वाघ, व्दितीय क्रमांक कल्पना बाबुलाल पाटील तर तृतीय क्रमांक माधवी शेनपडु पवार यांनी पटकावला. यांना बक्षीस म्हणुन महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे, प्रा. शामसिंग वळवी, प्रा.राहुल आहेर तसेच महाविद्यालयातील ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते ग्रंथालयामार्फत ग्रंथ भेट देण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वनश्री बैसाणे या विद्यार्थ्यीनीने केले तर कार्यक्रमाचे सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे आभार अमीर झारी यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथालयातील कर्मचारी श्री. सुभाष बागुल, श्री. विजय आगळे, श्री.सुधिर पाटील, श्री. विशाल भदाणे, श्री. मनोज ठाकरे, श्रीमती, आम्रपाली सुर्यवंशी यांनी प्रयत्न केले. पुर्ण दिवस डॉ. अब्दुल कलाम वाचन कट्टा महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित करण्यात आला होता उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**




**भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचे प्रतिमा पुजन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर**



स्वागत व समारंभ कार्यक्रम







कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना विद्यार्थ्यीनी



**वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना**



## वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देतांना महाविद्यालयतील प्राचार्य, डॉ. जालिंदर अडसुळे सर व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी



वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भट देतांना महाविद्यालयतील प्रा.डॉ.संजीव पगारे सर



वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भट देतांना महाविद्यालयतील प्रा.गोपाल निंबाळकर सर



वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भट देतांना महाविद्यालयतील प्रा.राहुल आहेर सर



वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भट देतांना महाविद्यालयतील प्रा.दिलीप घोंगडे सर




## वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील विद्यार्थ्यी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी



**वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील विद्यार्थ्यी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी**



वाचन कटटात सहभागी विद्यार्थ्यी







समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम**

## अहवाल-२०१८-१९

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे ग्रंथालयातर्फे आयोजित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने १५ ऑक्टोबर २०१८ रोजी डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या दृष्टीकोनातुन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचनाची महत्व वाढावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांकरीता ग्रंथ प्रदर्शन व वाचनकट्टा हे उपक्रम दि. १५/१०/२०१८ रोजी वेळ ठिक दु. १:३० वाजता घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर अध्यक्ष स्थानी होते. सदरील कार्यक्रमात सुरुवातीला भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने आपल्या महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा निर्माण करण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. तसेच ग्रंथप्रदर्शनाचे देखिल विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते. ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी

आणि विद्यार्थ्यी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथालयातील कर्मचारी श्री. सुभाष बागुल, श्री. विजय आगळे, श्री.सुधिर पाटील, श्री. विशाल भदाणे, श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी यांनी प्रयत्न केले. पुर्ण दिवस डॉ. अब्दुल कलाम वाचन कट्टा व ग्रंथप्रदर्शन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित करण्यात आले त्यास उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला.

*ग्रंथपाल*

*गजेंद्र जगदेव*

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजनकरतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर



**महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांचे स्वागत करतांना प्राध्यापक डॉ.संजीव पगारे सर**



महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यां गंथप्रदर्शनाची पाहणी करतांना .



महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना ग्रंथपाल गजेंद्र जगदेव ग्रंथ प्रदर्शनाबददलमाहिती देतांना






## महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टात सहभागी विद्यार्थी









समता शिक्षण संस्था, पुणे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे)

## ता. जि. धुळे.

---

### अहवाल २०१९-२०

### भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिवस

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे येथे ग्रंथालयामार्फत भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव व ग्रंथालय कर्मचा-यानी केले होते.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ .रघुनाथ महाजन यांनी स्विकारले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. सुदाम राठोड उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित अध्यक्ष व प्रमुख पाहुणे आणि सर्व उपस्थित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोगत महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतात जगदेव यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण, मराठी भाषा सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्या परिपत्रकानुसार दरवर्षी आपल्या महाविद्यालयात ग्रंथालयामार्फत १५ ऑक्टोबर २०१९ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिवस या संबंघी विद्यार्थ्यांचे मनोगत व्यक्त साजरा करण्याचे या संबंघी विद्यार्थ्यांचे मनोगत व्यक्त करण्याचा कार्यक्रम व ग्रंथ प्रदर्शन इ.कार्यक्रमाचे आयोजनकरण्यातआले होते. त्याचबरोबर जगदेव यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची माहिती सांगितली अब्दुल कलाम हे शेवटच्या क्षणापर्यंत लोकांपर्यंत आणि नवयुवक विद्यार्थ्यीपर्यंत संवाद साधत राहिले. भारताचे पहिले वैज्ञानिक राष्ट्रपती म्हणुन त्यांना ओळखले जाते. वैज्ञानिक क्षेत्रामध्ये डॉ. कलाम यांनी उत्तम प्रगती केलेली आहे. त्यांच्या उत्तम कार्याबद्दल भारत सरकारने १९९७ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांची दुरदृष्टी अशी होती की, भारत देशाची आर्थिक प्रगती, सुबत्ता आणि आपला भारत देश महासत्ता होण्यास कारणीभुत आहे. असे कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोगत महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी केले. त्या नंतर विद्यार्थ्यानी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या

विचारकार्यावर मनोगत व्यक्त केलीत त्यामध्ये कु.संजना आखाडे, वृषभ अहिरे दिपक बैसाणे चेतना जाणे आणि प्रतिभा मोरे या विद्या र्थ्या नी उत्कृष्ट मनोगत सादर केलीत. या विद्यार्थ्यांना ग्रंथभेट देण्यात येणारआहे. देशातील समाजातील भ्रष्टाचार दोन मार्गांनी निपटुन काढता येणे शक्य आहे. एक आपण सनदशीर मार्गाने संसदेकरीता योग्य उमेदवार निवडुन देणे. दुसरे भ्रष्टाचार मुक्त समाजाची सुरुवात घरातील नैतिक मुल्यांपासुन होते आणि भ्रष्टाचार निर्मुलन करणे ह्या गोष्टी फक्त तीन व्यक्तींना करणे शक्य आहे. त्या म्हणजे आई वडील, शिक्षक व संसद हे तीन दैवतच काम करु शकतात. समाजाच्या भ्रष्टाचाराची पाळेमुळे ही घरामध्ये रुजलेली असतात.

सदरील वाचन प्रेरणा दिवसाबाबत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.रघुनाथ महाजन यांनी आपल्या मार्गदर्शन मनोगतातुन विद्यार्थ्यांना सांगितले की, हा उपक्रम आपल्या महाविद्यालयात पाच वर्षापासुन घेण्या ात येतआहे विद्यार्थ्यामधे वाचन संस्कृती ही लोप पावत चालली आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी, नवयुवकांनी दररोज वाचन करणे ही एक काळाची गरज आहे. असे मार्गदर्शन केले.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने ग्रंथालयातर्फे एम.एस. भाग-१व २ या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता वाचन वाचन कटटा आयोजन करण्यात आला होता.सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. त्यामुध्ये प्रा.डॉ.संजीव पगारे, प्रा.गोपाळ निंबाळकर प्रा.डॉ दिलीप घोंगडे, प्रा.राजेंद्र बैसाणे,प्रा.प्रीती वहाणे, प्रा.राहुल आहेर, प्रा.मेघावी मेश्राम, प्रा.डॉ.फरिदा खान, श्रीमती. आम्रपाली सूर्यवंशी, उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. सुभाष बागुल विजय आगळे यांनी सहकार्य कले. सदरील कार्यक्रमाचे उपस्थितांचे आभार मनोज ठाकरे यांनी मानले

डॉ.अब्दुल कलाम यांनी जयंती व वाचन प्रेरणा दिवस या कार्यक्रमाची सांगता ग्रंथ प्रदर्शनाच्या उदघाटनानंतर करण्यात आली. अशाप्रकारे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

**ग्रंथपाल**
**प्रा.गजेंद्र जगदेव**

**प्राचार्य**
**प्रा.डॉ.जालिंदर अडसुळे**

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ .रघुनाथ महाजन तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. सुदाम राठोडप्रतिमा पुजन करतांना



सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ .रघुनाथ महाजन मार्गदर्शन करतांना



महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव वाचन प्रेरणाबाबत मार्गदर्शन करतांना



कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित

